73

अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण योजनांना सहकारी तत्वावर लाभ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय, क्रमांक-गृनियो-२००१/प्र.क्र.४६/का.८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक- १७जानेवारी, २००२.

वाचाः-
१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक-टीसीएच-१०८५/१६०/(१२७)/का.९, दि. ४ ऑक्टोबर, १९८५.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक-अजगृ-१८९१/प्र.क्र.९७/ (९१)/का.९, दि. ३१ जुलै, १९९२.
३) शासन निर्णय,आदिवासी विकास विभाग, क्रमांक-अजगृ-१८९१/प्र.क्र.९७/(९१)/का.९, दि. ४ सप्टेंबर, १९९२.
४) शासन निर्णय,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक-बीसीएच-१०९६/प्र.क्र.६१९/मावक-२,दि. १-४-१९९८.
५) शासन शुध्दीपत्र,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक-बीसीएच-१०९६/ प्र.क्र.६१९/मावक-२, दि. १५-५-१९९९.
६) शासन शुध्दीपत्र,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक-बीसीएच-१०९९/प्र.क्र.५४५/मावक-२, दि.१७-२-१९९९.
७) शासन निर्णय,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक-बीसीएच-१०९९/प्र.क्र.२०४/मावक-२, दि. १९-८-२०००.
८) शासन परिपत्रक,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक-बीसीएच-२०००/प्र.क्र.२३७/मावक-२, दि. २-३-२००१.

शासन निर्णयः-मागासवर्गीयांच्या घरबांधणीसंबंधी असलेली सहकारी गृहनिर्माण योजना समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशान्वये सुधारित करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागाने दिनांक- ४ ऑक्टोबर, १९८५ च्या शासन निर्णयाव्दारे आदिवासी लाभार्थ्यांना सदर योजना लागू केली. शासन निर्णय,समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाने निर्गमित केलेला दिनांक १-४-१९९८ चा शासन निर्णय अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण योजनांना सहकारी तत्वावर लाभ देणेकरिता लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ही योजना परिणामकारकपणे राबविण्यासाठी यासोबत जोडलेल्या परिशिष्ट"अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व समावेशक आदेश म्हणून सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

17 MAR 2002

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
RB
7 FEB 2002
शाखा

संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ही योजना राबवितांना परिशिष्ट "अ" येथील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( आर. सी. जोशी )
सचिव

## परिशिष्ट - "अ"

शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र.गृनियो-२००१/प्र.क्र.४६/का.८,दिनांक १७जानेवारी,२००२ चे सहपत्र.

### अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण योजनेच्या अटी व शर्ती :-

### सर्वसाधारण अटी

१. महाराष्ट्र राज्यातील प्राधिकृत केलेल्या अनुसूचित जमाती गृहनिर्माण सहकारी संस्था ही महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० अंतर्गत पंजीबध्द झालेली असावी. अशा पंजीबध्द सहकारी गृहनिर्माण संस्था या योजनेंतर्गत अर्थसहाय्य व इतर सवलती मिळण्यास पात्र असतील.

२. या योजनेकरिता लाभ देण्यासाठी राज्याच्या क्षेत्राची खालीलप्रमाणे विभागणी करण्यात येत आहे.

वर्ग-(अ) महानगरपालिका क्षेत्र व "अ" व "ब" नगरपालिकांचे क्षेत्र

वर्ग-(ब) "क" वर्ग नगरपालिका क्षेत्र व ग्रामीण क्षेत्र.

३. अनुसूचित जमाती गृहनिर्माण संस्थेमध्ये सर्व सभासद हे अनुसूचित जमातीचे असावेत.

४. या पूर्वी ज्या अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थानी योजनेचा फायदा घेतला असेल अशा अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांच्या हस्तांतरणाच्या प्रस्तावाचा विचार केला जाईल. हे सभासद बदल मंजूरीचे अधिकार, अपर आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक,ठाणे,अमरावती,नागपूर यांना असतील. सभासद बदलाबाबतचा प्रस्ताव संबंधित प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे अपर आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक,ठाणे,अमरावती,नागपूर यांना मंजूरीसाठी परस्पर पाठवून अपर आयुक्त, आदिवासी विकास हे सदर बदलास अंतिम मंजूरी देतील. या संदर्भात अपर आयुक्त कार्यालयाच्या पूर्वसंमतीशिवाय अनुसचित जमाती गृहनिर्माण संस्थेतील एखादा गाळा हस्तांतरीत केल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यास संबंधित मूळ सभासदाकडून या योजनेंतर्गत देण्यात आलेले अर्थसहाय्य व्याजासहित वसूल केले जाईल व अशा सभासदाविरुध्द नियमानुसार कायदेशीर कार्यवाही केली जाईल. सभासदाच्या बदलास आयुक्तालयाची मान्यता असेल तरच सहकार निबंधकाने प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी विचारात घ्यावा.

५. ज्या गृहनिर्माण संस्थांना "युध्दोत्तर पुर्नवसन योजना" (पी.डब्ल्यु.आर.-२१९) अंतर्गत शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र.बीसीएच-१०८७/प्र.क्र.६४/४७६/मावक-२, दिनांक २३.६.१९८९ व शासन निर्णय, क्र.बीसीएच-१०९१/प्र.क्र.३५१/ मावक-२, दिनांक ६.७.१९९५ अन्वये यापूर्वी बांधकाम अनुदान दिलेले आहे. त्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

६. ज्या अनुसूचित जमाती व्यक्ती अनसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९च्या अधिनियमानुसार पिडीत झालेल्या आहेत. व घरे पूर्णत: किंवा अंशत: नष्ट झालेली आहेत. त्या व्यक्ती सुध्दा या योजनेअंतर्गत नियमानुसार पात्र असतील.

२. उत्पन्नाची मर्यादा व बांधकामावरील खर्चाची मर्यादा :-

| | उत्पन्न गट | उत्पन्नाची मर्यादा | बांधकामावरील खर्चाची मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | आर्थिकदृष्टया दुर्बल गट | रु.२५,०००/- पर्यंत वार्षिक | रु.६०,०००/-(अ.ब.) वर्ग मर्यादा |
| २ | अल्प उत्पन्न गट | रु.२५,००१ -ते रु.५०,००० वार्षिक | रु.१,००,००० (अ) वर्ग रु. ८०,०००/- (ब) वर्ग |
| ३ | मध्यम उत्पन्न गट | रु.५०,०००/-ते ७५,००० वार्षिक | रु.१,५०,००० (अ) वर्ग रु.१,००,००० (ब) वर्ग |
| ४ | मध्यम उच्च उत्पन्न गट | रु.७५.००१ ते रु.९५०००/- | रु.१,५०,००० (अ) वर्ग रु.१,००,००० (ब)वर्ग |

या योजनेंतर्गत उत्पन्नाचा विचार करतांना सभासदाचे स्वत:चे सर्व मार्गाने मिळणारे एकत्रित उत्पन्न असा अर्थ अभिप्रेत आहे. त्यामुळे मूळ वेतन, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर मार्गांनी मिळणा-या सर्व रकमा धरुन मागील आर्थिक वर्षातील (१२ महिन्यांचे) वार्षिक उत्पन्नाची रक्कम धरावी.

३. योजनेंतर्गत मिळणारे सहाय्य :-

(१) जमीन :- शासकीय जमीन उपलब्ध असेल तर ती जमीन संस्थेला विनामुल्य देण्यात येईल. याकरिता जिल्हयाचे जिल्हाधिकारी महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी) जमिनीची विल्हेवाट नियम १९७१ मधील नियम २७ च्या अधिन राहून जिल्हयात असणा-या जमीनीचे वाटप संस्थेच्या नावे करण्यास सक्षम राहतील.

(२) एखाद्या संस्थेने खाजगी जमीन विकत घेतलेली असेल किंवा त्यांना विकत घ्यावयाची असेल तर सदरहू जमीनीची किंमत नगर रचनाकार विभाग ठरवतील ती किंमत किंवा प्रत्यक्षातील खरेदीची किंमत यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम संस्थेला त्या "जमिनीची किंमत" म्हणून अर्थसहाय्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे जर एखादी अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्था ही इतर प्राधिका-यांकडून (उदा.म्हाडा, सिडको,पिंपरी,चिंचवड प्राधिकरण किंवा इतर स्वायत्त संस्था) जमीन

भाडे कराराने (Lease) घेणार असेल तर त्या गृहनिर्माण संस्थेला नगर रचना विभाग ठरवितील ती किंमत किंवा प्रत्यक्ष भाडे कराराची किंमत (Lease) यातील जी किंमत कमी असेल ती किंमत "जमिनीची किंमत" म्हणून गृहनिर्माण संस्थेला देण्यात येईल.

(३) कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या क्षेत्रातील जमीन जर एखाद्या संस्थेने मागितली असेल तर त्या जमिनीची मागणी कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे संबंधित जिल्हाधिकारी यांनी करुन त्या संस्थेला जमीन उपलब्ध करुन द्यावी.

(४) वर्ग"अ" क्षेत्रामध्ये अनुसूचित जमाती गृहनिर्माण संस्थेचे बांधकाम त्या विभागामध्ये उपलब्ध असलेले"चटई क्षेत्र निर्देशांक" विचारात घेवून बहुमजली असणे आवश्यक आहे व प्रत्येक सभासदांसाठी कमाल ४०० चौ.फुट गाळ्याचे "चटई क्षेत्र" मर्यादित राहील. तसेच वर्ग "ब" क्षेत्रामध्ये प्रत्येक सभासद कमाल २ गुंठे जमीनीसाठी (Open land) पात्र असेल.

(५) "बांधकाम खर्चाची मर्यादा" (परिच्छेद-२) ही संज्ञा लाभार्थीची २०%स्वहिस्सा वर्गणी व ३०% बांधकाम अनुदान यासाठी "मानक" (Standard) म्हणून वापरण्यात यावी. वित्तीय संस्थेने लाभार्थ्यांचे उत्पन्न व त्यामधून त्याला देय होणारे कर्ज देणे आवश्यक राहील. बांधकाम खर्चाच्या मर्यादेचा संबंध त्या लाभार्थ्यांला देय होणा-या कर्जाशी असणार नाही.

(६) अनूसुचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थांनी खरेदी केलेल्या जमिनीकरिता शासन निर्णय, समाकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र.बीसीएच-२०००/ प्र.क्र.२३७/ मावक-२, दिनांक २ मार्च,२००१ अन्वये मुद्रांक शुल्क (Stamp Duty) आकारु नये. या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

(७) विकास निधी (Development Charges) - महानगरपालिका, नगरपालिका किंवा स्थानिक संस्था यांनी जर विकास निधी त्या त्या क्षेत्रासाठी लागू केलेला असल तर त्या संस्थेने भरावयाचा विकास निधी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे संबंधित महानगरपालिका, नगरपालिका किंवा स्थानिक संस्था यांना अदा करतील.

४. <u>व्यक्तिगत वर्गणी, बांधकाम अनुदान, बिनव्याजी कर्जे :-</u>

(१) अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण योजनेंतर्गत प्रत्येक सभासदाची व्यक्तीगत वर्गणी २०% (रोखीने अथवा श्रमदान स्वरुपात) अशी राहील. त्याचप्रमाणे या योजनेंतर्गत घराच्या बांधकाम खर्चाची मर्यादा (परिच्छेद-२ प्रमाणे) विचारात घेऊन त्या आधारे ३०% बांधकाम अनुदान देय राहील. मध्यम उत्पन्न गटातील व मध्यम उच्च उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना शासनाकडून दिले जाणारे हे ३०% बांधकाम अनुदान मिळणार नाही.

(२) या योजनेंतर्गत बांधकाम खर्चाच्या मर्यादेच्या निकषाच्या आधारे (परिच्छेद-२ प्रमाणे) शासनाकडून १०% व्याजाचे अनुदान दिले जाईल. एकूण कर्जावरील १०% पेक्षा जास्तीचे व्याज हे संबंधित लाभार्थ्यांने देणे आवश्यक राहील.

(३) जमिन विकासासाठी बिनव्याजी कर्ज संस्थेच्या प्रत्येक सभासदाला पुढीलप्रमाणे अनुज्ञेय राहील. (कर्ज प्रस्ताव फक्त महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळाचाच असणे अनिवार्य आहे.)

| | उत्पन्न गट | बिनव्याजी कर्ज |
|---|---|---|
| १ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ("अ" व "ब" वर्ग) | रु.६,०००/- |
| २ | अल्प उत्पन्न गट<br>"अ"वर्ग<br>"ब" वर्ग | <br>रु.८,०००/-<br>रु.६,०००/- |
| ३ | मध्यम उत्पन्न गट | कोणतेही बीनव्याजी कर्ज मिळणार नाही. |
| ४ | मध्यम उच्च उत्पन्न गट | कोणतेही बीनव्याजी कर्ज मिळणार नाही. |

(४) गृहनिर्माण संस्थेतील पात्र सभासदांना नियमानुसार देय होणारे ३०% बांधकाम अनुदान याबाबतचा प्रस्ताव दाखल केल्यानंतर १०%, जोत्यापर्यंत बांधकाम पूर्ण केल्यानंतर १०%, व छतापर्यंत बांधकाम केल्यानंतर १०% अशा तीन टप्प्यात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे सार्वजनिक बांधकाम विभागाने प्राधिकृत केलेल्या अभियंत्याचे प्रमाणपत्र घेऊन अदा करतील. (शासन निर्णय, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र.बीसीएच-१०९९/प्रक्र.५४५/ मावक-२/दिनांक १७ फेब्रुवारी,१९९९.)

५. <u>कर्जाची उपलब्धता :-</u>

(१) बांधकामासाठी कर्ज हे महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ,तसेच आयुर्विमा महामंडळ, एच.डी.एफ.सी., राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका किंवा इतर खाजगी शासनमान्य वित्तीय संस्थेकडून या योजनेंतर्गत बांधकामासाठी कर्ज घेण्यास शासन मान्यता देत आहे.

(२) संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेला शासनाकडून १०% व्याज अनुदान (बांधकाम खर्चाच्या मर्यादेच्या अधीन राहून) देण्यात येईल. त्यापेक्षा होणारे अधिकचे व्याज हे संबंधित गृहनिर्माण संस्थेने देणे आवश्यक राहील. जर संस्थेद्वारे कर्जाच्या हप्त्याची

परतफेड नियमितपणे व वेळेवर झाली नाही तर संबंधित अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात आलेल्या १०% व्याजाच्या अनुदानाची वसूली संस्थेकडून करण्यात येईल. संबंधित अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्था व संबंधित विभागाचे प्रकल्प अधिकारी यांचे बँकेच्या संयुक्त खात्यात त्या संस्थेला देय होणारे १०% व्याजाचे अनुदान त्या त्या आर्थिक वर्षासाठी जमा करण्यात येईल. संबंधित गृहनिर्माण संस्थेने त्याच्या हिस्स्याची व्याजाची रक्कम व कर्जाच्या हप्त्यांची रक्कम या संयुक्त खात्यात जमा केल्यानंतरच संबंधित वित्तीय संस्थेला कर्जाचे हप्ते अदा करण्यात यावेत.

६. <u>अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थांना तयार गाळे घेतांना देण्यात येणारे अनुदान :-</u>

(१) <u>जमिनीच्या किंमतीपोटी अनुदान</u> :-अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण योजनेतर्गत दिल्या जाणा-या दराने जमिनीच्या किंमतीपोटी देय होणारी जमिनीची किंमत (परिच्छेद-३ (२) प्रमाणे) अनुदान म्हणून अनुसूचित जमाती सभासदांना तयार गाळे घेताना दिली जाईल. अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून खरेदी करण्यात यावयाच्या इमारतीच्या किंमतीमध्ये ही जमिनीची किंमत सभासदांमध्ये विभागण्यात यावी.

(२) <u>बांधकाम अनुदान</u> :- या योजनेखाली देय होणारे ३०% बांधकाम अनुदान (परिच्छेद ४(१) प्रमाणे) हे संस्थेतील अनुसूचित जमातीच्या सभासदांना देण्यात येईल.

(३) वरील सवलती या अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण योजनेखाली विहित उत्पन्न मर्यादेत (परिच्छेद-२ प्रमाणे) बसणा-या सभासदांनाच लागू असतील. ज्या अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्था म्हाडा, हुडको, सिडको किंवा खाजगी बांधकाम व्यावसायिक यांच्याकडून बांधण्यात आलेले तयार गाळे एकरकमी तत्वावर खरेदी करु इच्छित असतील, तर त्यानासुध्दा वरील परिच्छेद क्र.४ (१) मध्ये दिल्यानुसार लाभ देण्यात येईल.

७. <u>अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थांना देय असणा-या कर्जास हमी :-</u>

(१) या योजनेंतर्गत अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थांना महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ यांचेकडून किंवा आयुर्विमा महामंडळ, एच. डी. एफ. सी., राष्ट्रीयकृत बँका,सहकारी बँका किंवा इतर शासन मान्य वित्तीय संस्था यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या अटी व शर्तीवर कर्ज घेता येईल. परंतु ज्या अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण

वित्तीय महामंडळाकडून कर्ज घेणार असतील त्यांच्याच कर्जाला, बांधकाम खर्चाच्या मर्यादेच्या अधीन राहून (परिच्छेद-२ प्रमाणे) शासन हमी दिली जाईल व त्यासाठी प्रचलित हमी दराप्रमाणे संस्थेकडून हमी शुल्क वसूल करण्यात येईल.

(२) महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळा व्यतिरिक्त इतर वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जास शासन हमी दिली जाणार नाही. संबंधित अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थांना, वैयक्तिक हमी किंवा संस्थेच्या हमीवर स्वबळावर कर्ज घ्यावे लागेल. संबंधित अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्था व त्यांना कर्ज देणा-या वित्तीय संस्था यांनी आपापसांत कर्ज देण्याबाबत व वसूलीबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.

८. <u>अर्थसहाय्य/कर्ज मिळण्याची पध्दती :-</u>

(१) संबंधित अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थेने सादर केलेले परिपूर्ण प्रस्ताव संबंधित प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत संबंधित अपर आयुक्त यांचेकडे या योजनेंतर्गत बांधकाम अनुदान/कर्ज मिळण्यासाठी पाठविण्यात येतील. अपर आयुक्त सदर प्रस्तावाची तपासणी करुन कर्ज मंजूरीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण महामंडळ किंवा आयुर्विमा महामंडळ, एच.डी.एफ.सी.,राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका किंवा इतर खाजगी वित्तीय संस्था यापैकी सहकारी गृहनिर्माण संस्था ज्या संस्थाकडून कर्ज घेऊ इच्छित असतील त्या संस्थाकडे पाठवतील.

(२) या योजने अंतर्गत संबंधित अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्था ज्या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊ इच्छित असतील त्या संस्थेच्या अटी व शर्ती ज्या संस्था पूर्ण करीत असतील त्यांना बांधकाम अनुदान अदा करण्यापूर्वी सुध्दा त्यांच्या कर्जाचा प्रस्ताव ते ज्या वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊ इच्छितात त्या संस्थेकडे पाठविण्यात येईल व नंतर त्यांना नियमाप्रमाणे देय होणारे बांधकाम अनुदान (३०%) मंजूर करण्यात येईल.

९. <u>कर्जफेडीबाबत :-</u>

एखादी अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्था संबंधित वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे व्याज व हप्ते विहित वेळेवर, वित्तीय संस्थेकडे भरत नाही असे आढळून आल्यास वित्तीय संस्थेने नियमाप्रमाणे संबंधित गृहनिर्माण संस्थेविरुध्द योग्य ती कारवाई परस्पर करुन त्याबाबतची सविस्तर माहिती संबंधित प्रकल्प अधिकारी यांना कळवावी. जर एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील जो सभासद वित्तीय संस्थेकडील कर्ज व व्याजाची अदायगीचे हप्ते गृहनिर्माण संस्थेकडे भरत नसेल तर त्यांचेवर नियमानुसार गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन/सचिव यांनी

कारवाई करुन त्या सभासदाबाबत वित्तीय संस्थेस व प्रकल्प अधिकारी यांना लेखी कळवावे व असे लेखी प्रमाणपत्र वित्तीय संस्थेने संबंधित गहनिर्माण संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन सबंधित सभासदाविरुध्द परस्पर नियमानुसार योग्य ती कारवाई करावी व त्याचा आदिवासी विकास विभागास सविस्तर अहवाल द्यावा.

१०. <u>कर्ज वसुली :-</u>

संबंधित वित्तीय संस्थेने संबंधित अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थेला दिलेल्या कर्जाची वसूली ही नियमानुसार परस्पर करावी. याबाबतच्या कर्ज वसूलीस शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

११. <u>नियंत्रण अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी:-</u>

अनुसूचित जमाती सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य" ही योजना अपर आयक्त, आदिवासी विकास,ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर यांनी कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत राबवावी. या योजनेचे योग्यरितीने संचालन व परिरक्षण होण्याच्या दृष्टीने अपर आयुक्त, आदिवासी विकास,ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर यांनी या योजनेचे "नियंत्रक अधिकारी" म्हणून काम करावे. तसेच सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना या योजनेसाठी "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

-----------